**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

क्रमांक — एसईसी/आरपीपी/२००९/सीआर-४९/का-११,
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- १०/१०/२०१२.

**वाचा**:- राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक- एसईसी/आरपीपी/२००९/
सीआर-४९/का-११, दिनांक- २४ जानेवारी, २०१२.

**आ दे श**

नगर परिषद व नगर पंचायतींच्या निवडणुकीच्या बाबतीत महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम, १९६६ मधील नियम १२(२) मध्ये मान्यताप्राप्त राजकीय पक्षातर्फे निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराच्या नामनिर्देशनपत्रामध्ये १ सूचक व इतर उमेदवारांच्या बाबतीत ५ सूचक असणे आवश्यक आहे अशी तरतूद आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या उपरोक्त दिनाक २४/१/२०१२ च्या आदेशासोबत महानगरपालिका, नगर परिषदा, नगर पंचायती यांच्या निवडणुकीच्या बाबतीत उमेदवारांनी राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत असल्याबाबतचे सुधारित जोडपत्र-१ व जोडपत्र-२ विहित करण्यात आले आहे. त्यामध्ये सदरचे सूचनापत्र नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी दुपारी ३.०० वाजेपर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे पोहोचविणे आवश्यक आहे अशी तरतूद आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या उपरोक्त आदेशातील तरतूद तसेच निवडणूक नियमातील उक्त तरतूद विचारात घेता मान्यताप्राप्त राजकीय पक्षातर्फे निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र छाननीमध्ये वैध ठरलेल्या उमेदवाराने; नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी दुपारी ३.०० वाजेपर्यंत जोडपत्र-१ व जोडपत्र-२ सादर केली नाहीत असे घडू शकते. याकरीता पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-

(अ) छाननीमध्ये वैध ठरणाऱ्या नामनिर्देशनपत्राच्या बाबतीत उमेदवाराने जर ५ सूचक दिले असतील व असा उमेदवार जोडपत्र-१ व जोडपत्र-२ विहित कालमर्यादेत सादर करू न शकल्यास असा उमेदवार अपक्ष म्हणून ग्राह्य धरला जाईल अशा आशयाची टीप छाननीच्या निर्णयात तसेच वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांच्या यादीत नमूद करण्यात यावी.

(ब) छाननीमध्ये वैध ठरणाऱ्या नामनिर्देशनपत्राच्या बाबतीत उमेदवाराने जर ५ पेक्षा कमी सूचक दिले असतील व असा उमेदवार जोडपत्र-१ व जोडपत्र-२ विहित कालमर्यादेत सादर करू न शकल्यास अशा उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र अवैध ठरविले जाईल अशा आशयाची टीप छाननीच्या निर्णयात तसेच वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांच्या यादीत नमूद करण्यात यावी.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( अविनाश सणस )
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
सर्व नोंदणीकृत राजकीय पक्ष
राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी
निवड नस्ती.